REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 11 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2021

# अनुसूचीत जाती सुधारणा योजनेतील वाढीव अनुदानाचा अभ्यास

डॉ. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे
सहयोगी प्राध्यापक व राज्यशास्त्र, विभाग प्रमुख, शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज, कोल्हापूर.

## प्रस्तावना:



अनुसूचीत जातीतील गावकुशाच्या बाहेर राहत असलेला समाज आहे. हा समाज पिढयांन–पिढया मागसलेला आहे. या समाजामध्ये महाराष्ट्रात ५९ जातींचा समोवश आहे. या जाती विकासापासून वंचित राहिल्याने या जातीतील वस्तीमध्ये राहणाऱ्या लोकांचे राहणीमान उंचावणे. याकरिता महाराष्ट्र शासनाने १९७४ साली हरिजन वस्ती सुधारणा योजना सुरु केली. हरिजन वस्तीत राबवित असलेल्या या योजनेच्या हरिजन या नावाला दलित संघटनानी विरोध केला. सदर योजनेचे नाव ‘दलितवस्ती सुधारणा योजना’ नावाने सुरु होती. याच योजनेचे सध्या ‘अनुसुचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास’ या नावाने गावपातळीवर अनुसूचीत जातीच्या वस्तीत योजना राबविली जाते.

## योजनेचे स्वरुप:

दलितवस्तीत मुलभूत सुविधा जसे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, स्वच्छता विषयीक सोयी मलनिस्सरण, वीज, वस्तीला जोडणारे रस्ते, समाजमंदिर इत्यादी व्यवस्था करुन दलितवस्तीची सर्वांगीण सुधारणा करण्याची योजना आहे.

महाराष्ट्र शासन अनुसूचीत जाती व नवबौध्द वस्तीच्या विकासासाठी अनुदान देते. योजना सुरु झाल्यापासून शासनाच्या अनुदानात वाढ होत गेली आहे. या अनुदानवाढीत दलितवस्ती सुधारणाच्या योजनेच्या महागाई निर्देशानुसार शासन अनुदान झालेल्या बदलाचा अभ्यास हा संशोधनाचा मुख्य विषय आहे.

## उद्दिष्ट:

१. अनुसूचीत जाती व नवबौध्द सुधारणा योजनेतील वाढीव अनुदानाचा अभ्यास करणे.

## गृहितक:

१. अनुसूचीत जाती व सुधारणा योजनेच्या वाढीव अनुदानाने दलित वस्तीत सुधारणा झाली आहे.

## संशोधन पध्दती:

प्रस्तुत संशोधनात प्राथमिक व दुय्यम साधनांचा वापर केला आहे. प्राथमिक साधनामध्ये नागरिक व लोकप्रतिनिधीच्या मुलाखती घेतलेल्या आहेत. दुय्यम साधनामध्ये महाराष्ट्र शासनाचे निर्णय, वृत्तपत्र इत्यादींचा वापर संशोधननास केलेला आहे.

## अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे:

प्रस्तुत योजनेची सुरवात १९७४ साली त्यावेळी वस्तीच्या सुधारणा योजनेसाठी ५० हजार रुपये योजनेला अनुदान दिले जात होते. महाराष्ट्र शासनाकडून हे अनुदान जिल्हापरिषदेच्या समाज न्याय विभागाकडे दिले जाते. महाराष्ट्र शासनाने बहुतांश दलितवस्तीचा निधी प्राप्त व्हावा. दलित वस्तीती सुधारणा व्हावी. याकरिता महागाई निर्देशनानुसार व लोकसंख्येनुसार अनुसूचीत जातीतील सर्व जातीना न्याय मिळावा याकरिता निकष तयार केले.

**लोकसंख्येनुसार मिळणारे अनुदान**

| अ.क्र. | लोकसंख्या | अनुदान |
|---|---|---|
| १ | १० ते २५ | २ लाख |
| २ | २६ ते ५० | ५ लाख |
| ३ | ५१ ते १०० | ८ लाख |
| ४ | १०१ ते १५० | १२ लाख |
| ५ | १५१ ते ३०० | १५ लाख |
| ६ | ३०१ च्या पुढे | २० लाख |

लोकसंख्येनुसार वाटप करण्यात आल्यामुळे दलितांमधील छोटया जातींना दलितवस्ती सुधारणा योजनेचे अनुदान प्राप्त होऊ लागले. लोकसंख्येच्या प्रमाणात अनुदान देण्यात येऊ लागले. २ लाखापासून २० लाखापर्यंत अनुदान वाढ झाल्याने दलितवस्तीत विविध सोयी सुविधा उपलब्ध झाल्या. दलितवस्तीत सुधारणा योजनेची प्रभावी अंमलबजावणीला गती मिळाली.

अनुसूचीत जाती व नवबौध्द वस्तीतील घटकांचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जिल्हा परिषदेच्या सामाजिक न्याय विभाग (समाज कल्याण विभाग) अनुदानात दुप्पट वाढ करण्यात आली.

**लोकसंख्येच्या प्रमाणात वाढीव मिळणारे अनुदान**

| अ.क्र. | वस्तीची लोकसंख्या | कमाल अनुदान लाखात |
|---|---|---|
| १ | १० ते २५ | ४ लाख |
| २ | २६ ते ५० | १० लाख |
| ३ | ५१ ते १०० | १६ लाख |
| ४ | १०१ ते १५० | २४ लाख |
| ५ | १५१ ते ३०० | ३० लाख |
| ६ | ३०१ च्या पुढे | ४० लाख |

अनुदानातील ही वाढ दुप्पट करण्यात आली आहे. महागाई निर्देशकानुसार वाढीवा निर्णय महाराष्ट्र शासनाने घेतला आहे. ग्रामीण भागातील अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकापर्यंत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विचार पोहचविण्यासाठी व शालेय विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी अभ्यासिका देखील सुरु करणे. राज्य व केंद्र शासनाच्या योजनेची माहिती ग्रामीण भागात पोहचविण्यासाठी राज्यात ग्रंथालय व अभ्यासिका या सारख्या आद्यावत सुविधा इतर संविधान सभागृह सुरु केले जाणार आहे. ज्यागावात ५०० किंवा त्यापेक्षा अधिक अनुसूचित जाती व नवबौध्द समाजाची लोकसंख्या आहे.

(२०११ च्या जनगणनेनुसार) (तरुण भारत, कोल्हापूर २० ऑक्टोबर, २०२१) त्या गावांत पहिल्या टप्प्यात संविधान सभागृहे उभारली जाणार आहेत.

कोल्हापूर जिल्हयातील संविधान सभागृहासाठी पात्र असलेल्या गावांची यादी शासनाला सादर केलेली आहे. जिल्हयात १७८ वस्त्या संविधान सभागृहासाठी पात्र ठरलेल्या आहेत. या संविधान सभागृहासाठी जास्तीतजास्त ४० लाखापर्यंत शासनाकडून निधी दिला जाणार आहे. याची कोल्हापूर जिल्हयातील तालुक्यानिहाय यादी खालील प्रमाणे

**तालुकानिहाय संविधान सभागृहासाठी पात्र गावांची संख्या**

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | संविधान सभागृहासाठी पात्र गावांची संख्या |
|---|---|---|
| १ | आजरा | १ |
| २ | भुदरगड | १३ |
| ३ | चंदगड | ०१ |
| ४ | गडहिंग्लज | ०९ |
| ५ | गगनबावडा | ०० |
| ६ | हातकणंगले | ४४ |
| ७ | कागल | १८ |
| ८ | करवीर | ४२ |
| ९ | पन्हाळा | १३ |
| १० | राधानगरी | १० |
| ११ | शाहूवाडी | ०४ |
| १२ | शिरोळ | ४४ |

(दीपक घाटे, समाजकल्याण अधिकारी, जि. प. कोल्हापूर)

कोल्हापूर जिल्हयात संविधान सभागृहासाठी एकूण १९९ गावे पात्र आहे. सर्वात अधिक पात्र गावांची संख्या ही दोन तालुक्याची आहे. हातकणंगले आणि शिरोळ या दोन्ही पात्र गावांची संख्या समान प्रत्येकी ४४ आहे. गगनबावडा तालुक्यात संविधान सभागृहास एक ही गाव पात्र नाही. सर्वात कमी पात्र गावांची संख्या आजरा आणि चंदगड तालुक्याची आहे. या प्रत्येक तालुक्यातील १ गाव पात्र आहे. शासनाने लोकसंख्येचे निकष लावून संविधान सभागृहाची पात्रता ठरविली आहे. हा निधी पुढील वर्षापासून प्राप्त (मंजूर) होणार आहे. परंतु शासनाची ही योजना अनुसूचीत जाती व नवबौध्द वस्तीचा विकासाच्यादृष्टीने महत्वाची आहे. शासनाच्या या योजनेबरोबर वाढीव निधीमुळे दलितवस्तीत विविध सोयीसाठी उपयुक्त ठरते.

## समारोप:

प्रस्तुत संशोधनात संशोधकाने अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या विकासासाठी शासनाने राबविलेल्या योजनांचा अभ्यास केला आहे. या योजनामध्ये वाढीव अनुदानाबरोबरच वस्तीमधील नवनवीन कार्याचा संकल्प केलला दिसतो. वेळोवेळी केलेल्या अनुदानातून अनुसूचित जाती व नवबौध्द वस्तीतील विकास कामे पार पडलेली आहेत. यातून वस्तीमध्ये भौतिक सुविधा प्राप्त झालेल्या आहेत. शासनाने महागाई निर्देशांकानुसार केलेली अनुदानाची वाढ त्याचा उपयोग उपेक्षित राहिलेल्या वस्तीला मिळणे प्राप्त ठरते.

**निष्कर्ष:**

१. अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीच्या विकास योजनेमुळे वस्तीतील लोकांचे राहणीमान उंचाविलेले आहे.
२. अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीच्या विकास योजनेतील वाढीव अनुदानामुळे वस्तील सोयी सुविधा उपलबध्द झाल्या आहेत.
३. अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांचा वस्तीच्या विकासासाठी महागाईनुसार व वाढलेल्या कामाच्या स्वरुपानुसार अनुदानात वाढ केलेली दिसते.

**संदर्भ:**

१) लोकप्रतिनिधींच्या मुलाखती
२) नागरिकांच्या मुलाखती
३) चौगले कृष्णात, 'समाजकल्याण'चे अनुदान दुप्पट', दैनिक तरुण भारत (२० ऑक्टोबर, २०२१)
४) घाटे दिपक, समाजकल्याण अधिकारी जिल्हापरिषद, कोल्हापूर)
५) शासन निर्णय क्रमांक : संकीर्ण—२०२१/प्र.क्र. ७९, (६ ऑक्टोबर, २०२१) अनुसूचीत जाती व नवबौध्द घटकांचा वस्त्यांच्या विकास करणे योजने अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाच्या रक्कमीत वाढ करणे तसेच संविधान सभागृहाचे बांधकाम करणे.
६. इंटरनेट